महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/लेखा २/खरेदी/२०२१-२२/ 2173 दिनांक १४/०५/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,
सर्व शासकीय तंत्र निकेतने व तत्सम संस्था,
पुणे विभाग.

विषय :- आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून करावयाच्या खरेदीबाबत.
संदर्भ : - तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई पत्र क्र.११/तंशिसं/खरेदी/२०२१-२२/२२, दिनांक ०७ मे २०२१

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. (सोबत प्रत जोडण्यात येत आहे) त्यानुसार संचालनालयाने असे कळविले आहे की, राज्यातील शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, तंत्र निकेतने यांना राज्य शासनाकडून आर्थिक वर्ष २०२१-२२ करीता मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातुन ज्या उपकरणांची/यंत्रसामुग्री/फॅर्निचर ची खरेदी करावयाची आहे. त्याची यादी विभागीय स्तरावर संकलीत करून व तपासणी करून संचालनालयास सादर करावयाच्या आहेत.

करीता सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये निधी अभावी खरेदी होवू न शकल्याने, जर संस्थांना त्यांनी २०२०-२१ साठी सादर केलेली खरेदी यादी पुन्हा सादर करावयाची असल्यास, त्यांनी यादी नव्याने सादर करण्याची गरज नाही. मात्र तसे या कार्यालयास लेखी कळविणे आवश्यक आहे. परंतु पूर्वी सादर केलेल्या २०२०-२१ च्या यादीत संस्थांना प्राध्यान्यक्रम बदलविण्याची आवश्यकता वाटल्यास, त्यांनी सुधारीत यादी या कार्यालयास २ प्रतीत सादर करावी.

तरी उपकरणे/यंत्रसामुग्री/फॅर्निचर च्या यादया, त्यासोबतची पत्रे, स्कॅन कॉपी, व एक्सेल प्रत (सर्व दोन प्रतीत) या कार्यालयास दिनांक २१ मे २०२१ पर्यंत सादर करण्यात याव्यात. जेणेकरून विभागीय कार्यालय स्तरावर पुढील कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण करून प्रस्ताव संचालनालयास सादर करणे शक्य होईल. तरी संस्थाप्रमुखांनी सदर कामकाजात व्यक्तीशः लक्ष घालून वेळेत विभागीय कार्यालयास प्रस्ताव सादर करावेत. विहीत मुदतीत प्रस्ताव प्राप्त न झाल्यास त्यास संस्थाप्रमुख जबाबदार असतील याची नोंद घ्यावी.

सेबत - वरीलप्रमाणे.

१४/०५/२१
(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

C:\Users\ropune\Desktop\bhilave.docx

**तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य**

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी क्र.०२२-68597431, 68597470

ई-मेल-desk11@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : 11/तंशिसं/खरेदी/2021-22/२२ दिनांक : 07/05/2021

प्रति,

सहसंचालक,

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई , नागपूर,पुणे,औरंगाबाद, नाशिक,अमरावती

**विषय :-** आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून करावयाच्या खरेदीबाबत

**संदर्भ :-** दिनांक ३० एप्रिल २०२१ रोजीच्या आढावा बैठकितील चर्चा

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भीय दिनांक ३० एप्रिल २०२१, रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे आयोजित आढावा बैठकीत निर्देश दिल्यानुसार , राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये , तंत्र निकेतने , औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालये यांना राज्य शासनाकडून आर्थिक वर्ष २१-२२ करीता मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानांतून ज्या उपकरणांची / यंत्र सामुग्री / फर्निचर ची खरेदी करावयाची आहे त्याची यादी विभागीय स्तरावर संकलित करून व तपासणी करून या कार्यालयास सादर करावयाची आहे. या संदर्भात सूचित करण्यात येते कि, आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये निधी अभावी खरेदी होऊ न शकल्याने , जर संस्थांना त्यांनी २०२०-२१ साठी सादर केलेली खरेदी यादी पुन्हा सादर करावयाची असल्यास , त्यांनी यादी नव्याने सादर करण्याची गरज नाही. मात्र तसे त्यांनी विभागीय कार्यालयास लेखी कळविणे आवश्यक आहे. परंतु ,


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
14 MAY 2021
3924
आवक क्र. ............

या पूर्वी सादर केलेल्या २०२०-२१ च्या यादीत संस्थांना प्राधान्यक्रम बदलविण्याची आवश्यकता वाटल्यास , त्यांनी सुधारित यादी विभागीय कार्यालयास सादर करावी , अश्या सूचना आपल्या अधिनस्त संस्थांना द्याव्यात

विभागीय स्तरावर प्राप्त झालेल्या याद्या व संस्थांची पत्रे एकत्र करून , स्कॅन कॉपी व एक्सेल प्रत , या कार्यालयास दिनांक ३१ / ०५/२०२१ पर्यंत सादर करण्यात याव्या .

(डॉ. धनपाल कांबळे)
प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण संचालनालय ,म . रा मुंबई

**प्रत :-** १) प्राचार्य, सर्व शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये आणि शासकीय तंत्र निकेतने व तत्सम संस्था यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.